# नाशिक महानगरपालिका, नाशिक

नाशिक महानगरपालिका संचलित एकूण 4 अनुदानित आणि 9 विनाअनुदानित मनपा माध्यमिक शाळांमधील शिक्षकांची 21 रिक्त पदे मानधन तत्वावर भरावयाची असल्याने पात्र व योग्य उमेदवारांकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहे.

रिक्त पदांचा तपशील

| अनु. नं. | विषय शिक्षक पदाचे नाव | पदसंख्या | मानधन मासिक दर | अनुशेष |
|---|---|---|---|---|
| मराठी माध्यम विनाअनुदानित माध्यमिक शाळा | | | | |
| 1 | बी. ए. बी.एड. इंग्रजी | 4 | 8000 | 1) अ.जाती - 02<br>2) अ.जमाती- 01<br>3) विजा अ - 01<br>4) भ ज क - 01<br>5) इमाव - 03<br>6) खुला - 09 |
| 2 | बी.एस्सी. बी. एड. विज्ञान / गणित | 4 | 8000 | |
| 3 | बी.ए.बी.एड. मराठी/भूगोल | 3 | 8000 | |
| 4 | बी.ए.बी.एड. स.शास्त्र | 3 | 8000 | |
| 5 | बी.ए.बी.एड. हिंदी/ इतिहास | 3 | 8000 | |
| | एकूण पदे | 17 | | |
| उर्दू माध्यम अनुदानित माध्यमिक शाळा | | | | |
| 6 | बी. ए. बी.एड. इंग्रजी | 1 | 8000 | 1) अ.जमाती- 01<br>2) विजा अ - 01<br>3) इमाव - 02 |
| 7 | बी.एस्सी. बी. एड. विज्ञान | 1 | 8000 | |
| 8 | बी.ए.बी.एड. स.शास्त्र | 1 | 8000 | |
| 9 | बी.ए.बी.एड. हिंदी/ मराठी | 1 | 8000 | |
| | एकूण पदे | 4 | | |

<u>वयोमर्यादा:-</u> सर्व पदांसाठी सर्वसाधारण पदांकरिता वयोमर्यादा 38 वर्षे व मागासवर्गीय उमेदवारांकरीता 5 वर्षे शिथिलक्षम असेल. नियुक्तीचे स्वरूप मानधन तत्वावर असेल.

<u>शैक्षणिक अर्हता तसेच इतर अटी व शर्ती :-</u>

1) सदर पदांसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी ज्या पदासाठी अर्ज करताय त्या पदाची (विषयानुसार) आवश्यक ती पदवी आणि व्यावसायिक अर्हता धारण केलेली असावी.
2) उच्च शैक्षणिक अर्हता तसेच अनुभव असणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.
3) उमेदवाराला संगणकाचे पुरेसे ज्ञान तसेच उमेदवाराने एम. एस. सी. आय.टी परीक्षा उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे.
4) उमेदवाराने ज्या पदासाठी अर्ज केला आहे, त्या पदाचा अर्जामध्ये स्पष्टपणे उल्लेख करणे आवश्यक आहे.
5) उमेदवाराने अर्ज करतांना विहित नमुन्यातील सर्व माहिती अचूक व पूर्णपणे भरावी.
6) अर्जदाराने अर्जासोबत सर्व प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडणे बंधनकारक आहे.(जसे- जन्मतारीख, शैक्षणिक पात्रतेची प्रमाणपत्रे व गुणपत्रके, शासन निर्णयानुसार जातीचा दाखला, तसेच जात वैधता प्रमाणपत्र इत्यादी.)
7) उमेदवाराने अर्जासोबत माहिती सादर करतांना सतत कार्यान्वित असलेला अचूक भ्रमणध्वनी क्रमांक व ई- मेल आयडी नमूद करावा.
8) उमेदवाराने अर्जामध्ये संपूर्ण नाव पत्ता, जन्मतारीख, जात, पोटजात, शैक्षणिक अर्हता अचूक नमूद कराव्यात.तसेच अर्जावर सध्याचा पासपोर्ट आकाराचा फोटो लावावा.
9) अपूर्ण तसेच आवश्यक कागदपत्रे सोबत जोडली नसतील तर उमेदवाराचा अर्ज बाद ठरविण्यात येईल याची नोंद घ्यावी.
10) उमेदवाराने अर्जासोबत महाराष्ट्र नागरी सेवा मर्यादित (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन ) नियम २००५ अन्वये प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

11) उर्दू माध्यमाकरिता मागासवर्गीय उमेदवार उपलब्ध न झाल्यास इतर संवर्गातील उमेदवारांचा विचार केला जाईल.
12) अर्जांची छाननी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर लेखी परीक्षेचा दिनांक व वेळ नंतर कळविणेत येईल.
13) लेखी परीक्षेमध्ये पात्र होणाऱ्या उमेदवारांची नंतर मौखिक परीक्षेकरिता अंतिम यादी प्रसिद्ध करणेत येईल.
14) उमेदवाराने अर्जासोबत जोडलेल्या सर्व साक्षांकित प्रतींच्या मूळ प्रमाणपत्रे तसेच मूळ कागदपत्रांची तपासणी मौखिक परीक्षेच्या वेळी करणेत येईल. कागदपत्रांची मूळ प्रत तपासणीच्या वेळी नसल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.
15) दोन्ही परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवारांची अंतिम निवड करण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवारांची यादी मनपा शिक्षण विभाग कार्यालय येथे प्रसिद्ध करण्यात येईल.
16) सदरची पदे हि मानधन तत्वावर अस्तित्वात राहतील. तसेच नेमणूक झालेल्या उमेदवारास नाशिक महानगरपालिकेच्या नियमित सेवेत कोणताही हक्क सांगता येणार नाही. तसेच न्यायालयात दाद मागता येणार नाही.
17) शिक्षक भरतीमध्ये दबाव व इतर गैरमार्गाचा अवलंब केल्याचे निदर्शनास आल्यास सदर उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.
18) वरील पदांबाबत उपरोक्त अटी व शर्ती नियमानुसार शिथिल करणे व वाढ करणे तसेच उपरोक्त नमूद पदसंख्येत तसेच अनुशेषात बदल करणे याबाबतचेअंतिम अधिकार निम्न स्वाक्षरीकार यांचे राहतील.

<u>उमेदवार निवडीची पद्धत:-</u>

**100 गुणांची परीक्षा :- या अंतर्गत लेखी परीक्षा 80 गुण,मौखिक परीक्षा २० गुण**

**<u>परीक्षा शुल्क:-</u>खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरिता रु.५००/- मागासवर्गीय उमेद्वारांकरिता रु.३००/-**

उमेदवारांनी अर्जासोबत वर नमूद केलेला परीक्षाशुल्क धनाकर्ष(DEMAND DRAFT) या स्वरुपात **मा.आयुक्त मनपा नाशिक** यांचे नावे असलेला सोबत जोडणे बंधनकारक आहे.

सदर जाहिरातीतील अर्ज पोष्टाने अथवा समक्ष स्वीकारण्याचा कालावधी दिनांक 07/06/2017 ते दिनांक14/06/2017 आहे. कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत कार्यालयीन सुट्टीचे दिवस वगळून मनपा शिक्षण विभाग कार्यालय, नवीन पंडित कॉलनी शरणपूर रोड, नाशिक या ठिकाणी दिनांक14/06/2017 पर्यंत स्वीकारले जातील.त्यानंतर पोष्टाने अथवा समक्ष येणारे अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाही याची नोंद घ्यावी. उमेदवाराच्या निवडीच्या पद्धतीत कोणत्याही प्रकारचे बदल करण्याचे सर्व अधिकार निम्न स्वाक्षरीकार यांनी राखून ठेवले आहे.

शिक्षणाधिकारी
मनपा शिक्षण विभाग नाशिक

आयुक्त
नाशिक महानगरपालिका, नाशिक

# नाशिक महानगरपालिका, नाशिक

.........................या विषय शिक्षक पदासाठी अर्ज

नजीकच्या
काळातील पासपोर्ट
साईझ फोटो लाऊन
त्यावर स्वताची
स्वाक्षरी करावी

प्रति,
मा. आयुक्त
नाशिक महानगरपालिका, नाशिक

1) संपूर्ण नाव: (आडनाव) (स्वतःचे नाव) (वडिलांचे/पतीचे नाव)
मराठी:- ------------------------------------------------------------------------------------------

इंग्रजी :- ------------------------------------------------------------------------------------------

2) पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता:- ------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------(पिन):-----------------------------

3) जन्मतारीख:- (अंकात) ------/------/------- (अक्षरी) ---------------------------------------------

4) धर्म:-------------------- जात:- -------------- पोटजात:-------------------

5) ह्यात अपत्ये:- ---------

6) शैक्षणिक अर्हता :- --------------------------------------------------------

भ्रमणध्वनी/संपर्क क्रमांक:- ------------------------------- ई-मेल:- -----------------------------------

**शैक्षणिक अर्हता**

| अनु.नं. | परीक्षेचे नाव | शालांत परीक्षा मंडळ/विद्यापीठाचे नाव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | विषय | गुणांची टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | |
| 2 | | | | | | |
| 3 | | | | | | |
| 4 | | | | | | |
| 5 | | | | | | |
| 6 | | | | | | |

## अनुभव

| अनु.नं. | शाळा/संस्थेचे नाव व पत्ता | धारण केलेले पद | कार्यरत कालावधी | | एकूण सेवा | सेवा सोडण्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत | | |
| 1 | | | | | | |
| 2 | | | | | | |
| 3 | | | | | | |
| 4 | | | | | | |

मी याद्वारे शपथपूर्वक कथन करतो /करते की मला शासकीय सेवेकरिता यापूर्वी अपात्र घोषित करण्यात आलेले नाही. मला फौजदारी गुन्ह्यात अटक व शिक्षा झालेली नाही तसेच माझेविरुद्ध कोणत्याही प्रकारचा फौजदारी न्यायालयात खटला प्रलंबित नाही. वर नमूद केलेली सर्व माहिती खरी असून जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषानुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी वरील पदासाठी पात्र आहे. त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळल्यास किंवा निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अथवा नेमणूक झाल्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास त्याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

ठिकाण:-                                                                 अर्जदाराची सही:-

दिनांक:-                                                                 अर्जदाराचे नाव :-